# ‘सावध क्लिक, सुरक्षित भविष्य’ ; विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचा संदेश

जळगाव, (प्रतिनिधी) : जामनेर तालुक्यातील न्यू इंग्लिश मीडियम स्कूल येथे आयोजित करण्यात आलेल्या सायबर अवेअरनेस कार्यक्रमात विद्यार्थ्यांना सुरक्षित डिजिटल जीवनाचे महत्त्व पटवून देण्यात आले. इंटरनेट आणि मोबाईलचा वाढता वापर लक्षात घेता सायबर गुन्ह्यांपासून बचावासाठी आवश्यक असलेली माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आली. हा कार्यक्रम दि. ६ ऑगस्ट रोजी पार पडला सायबर वॉरियर्स विद्या विशाल सोनवणे आणि साक्षी तानाजी पाटील यांनी विद्यार्थ्यांना ऑनलाइन फसवणुकीच्या नव्या पद्धती, फेक कॉल्स, बनावट ॲप्स, सोशल मीडिया फ्रॉड आणि वैयक्तिक माहितीच्या सुरक्षेबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे देत त्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले.

यावेळी Quick Heal Foundation तर्फे सायबर सुरक्षा मार्गदर्शक पुस्तिकांचे वितरण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी पुस्तिकांचा उत्साहाने स्वीकार करत त्यातील माहितीचा उपयोग दैनंदिन जीवनात करण्याचा निर्धार व्यक्त केला. प्राचार्य एस. एस. पाटील यांच्या उपस्थितीत आणि आर. बी. आमले सर यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेविषयी सकारात्मक दृष्टिकोन निर्माण झाला.

